| MHKO070020392025 | दाखल दिनांक | :– | २२/०८/२०२५ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | :– | २२/०८/२०२५ | | |
| | निकाल दिनांक | :– | २५/०५/२०२६ | | |
| | कालावधी | :– | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०० | ०९ | ०३ |

**भाग– 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)**

(घोषित दिनांकः– २५/०५/२०२६)

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१ जयसिंगपूर,**
**ता.शिरोळ, जि. कोल्हापूर येथील यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी अ. त्रिं. मनगिरे)**

**नियमित फौजदारी खटला क्र.१८५/२०२५** **निशाणी क्र.३६/ब**
**(जयसिंगपूर पोलीस स्टेशन गु.र.नं.४९४/२०२४)**

**महाराष्ट्र शासन तर्फे**
पोलीस ठाणे अधिकारी,
जयसिंगपूर पोलीस ठाणे,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर ........ **अभियोगपक्ष**

**विरुध्द**

१) **दिपाली सुनिल भानुसे,**
वय ३८ वर्षे, व्यवसाय – मजुरी
रा.हनुमान मंदिरजवळ, कोंडीग्रे चौक,
कोंडीग्रे, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

२) **विधीसंघर्षग्रस्त बालक** ........ **आरोपी**

**दोषारोप –** भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८ (१) सह ३ (५) प्रमाणे.

==========================================

श्रीमती व्ही.एस. पाराज–पाटील, सहाय्यक सरकारी अभियोक्ता सरकार पक्षातर्फे

श्री.एस.डी.जगदाळे, वकील आरोपी क्र.१ तर्फे

==========================================

**भाग– 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २४/१२/२०२४ |
| गुन्हा नोंद केल्याची तारीख | २५/१२/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख | २२/०८/२०२५ |
| गुन्हयाचा दोषारोप (Charge) ठेवल्याची तारीख | १३/१०/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १८/११/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची तारीख | २५/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २५/०५/२०२६ |
| शिक्षा सुनावली असल्यास, त्याची तारीख | – |

**आरोपीचा तपशील**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर मुक्त केल्याची तारीख | दोषारोपाचे कलम | निर्दोष की दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | वजावट कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दिपाली सुनिल भानुसे | बी.एन.एस.एस., २०२३ चे कलम ३५ (३) प्रमाणे नोटीस दिली. | दि.१३/१०/२०२५ | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८ (१) सह ३ (५) प्रमाणे. | निर्दोष | – | – |

## भाग– 'क'

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अभियोगपक्षाचा सा.क्र.१ | नानासो लक्ष्मण कांबळे | पंच साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र.२ | अनिल सदाशिव भानुसे | फिर्यादी |

## अभियोगपक्षातर्फे निशाणी क्रमांक देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

आरोपीने पुरावा दिलेला नाही.

## महत्वाचा वस्तुजन्य पुरावा

| अ.क्र | महत्वाचा वस्तुजन्य पुरावा क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

## :: न्यायनिर्णय ::

(घोषित दिनांकः– २५ मे, २०२६)

आरोपी क्र. १ हीस भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८ (१) सह ३ (५) प्रमाणे अंतर्भुत वर्णिलेल्या अभिकथित अपराधासाठी अभियोजित करण्यात आले आहे.

## अभियोगपक्षाचे खटल्यासंदर्भिचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे

२. घटना दिनांक दि.२४/१२/२०२४ रोजी २०.०० वाजण्याच्या सुमारास

फिर्यादी यांचे राहते घराचे दारात, कोंडिग्रे चौक, कोंडिग्रे, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथे (संक्षेपतः घटनास्थळी) घडली. फिर्यादी, फिर्यादी यांची आई, वडील व आरोपी यांचेत चार ते पाच दिवसांपुर्वी सामाईक शेतातील घेवडयाची वेल तोडण्याचे कारणावरुन वाद झाला होता. उपरोक्त नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ हिने विधीसंघर्षग्रस्त बालक याचेसोबत संगनमत करुन फिर्यादी यांच्या आई–वडीलांना शिवीगाळ करीत असताना फिर्यादी यांनी आरोपी क्र.१ हीस आणि विधीसंघर्षग्रस्त बालक यास तुम्ही माझ्या दरवाजात उभे राहुन शिवीगाळ का करत आहात असे विचारत असताना यातील आरोपी हिने दरवाजात पडलेली झाडाची कुंडी हातात घेवुन फिर्यादीच्या डोक्यात मारुन फिर्यादी यांना जखमी केले व विधीसंघर्षग्रस्त बालक याने बाजुला असलेल्या गाडीवर पडलेली फळी हातात घेवुन फिर्यादीच्या पाठीत मारुन फिर्यादीस जखमी केले. म्हणून ही फिर्याद.

३. घटनेची फिर्याद अनिल सदाशिव भानुसे यांनी जयसिंगपूर पोलीस स्टेशनला दिली. त्यानुसार गु.र.नं.४९४/२०२४ नोंदविण्यात आला.

४. सदर गुन्ह्याचा तपास व्ही.एन.पवार, पो.हे.कॉ.ब.नं.–२०४६, जयसिंगपूर पोलीस स्टेशन यांनी केला. तपासात घटनास्थळ पंचनामा दोन पंचासमक्ष केला. घटनेच्या संबंधीत साक्षीदारांकडे विचारपुस करुन त्यांचे जबाब भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १८० प्रमाणे नोंदवले. जखमीच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे घेतली. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा आल्यामुळे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

५. मी आरोपी क्र.१ विरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८ (१) सह कलम ३(५) प्रमाणे गुन्ह्याचा दोषारोप निशाणी ७ वर नोंदवला. तो आरोपीस मराठी भाषेमध्ये वाचून दाखवून व समजावून सांगितला असता तिने गुन्हा कबूल नसल्याचे नि.क्र.८ वरील निवेदनात सांगीतल्याने आरोपी क्र.१ विरुध्द खटला चालवण्यात आला. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी वर नमुद प्रमाणे केवळ दोन साक्षीदार तपासले आहेत. अभियोगपक्षाच्या पुराव्यात आरोपी क्र.१ विरुध्द दोषार्ह मजकुर न आल्याने आरोपी क्र.१ चे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ (१)

(ब) प्रमाणे निवेदन वगळण्यात आले.

६. अभियोगपक्षाची हकिकत, पुरावा व उभय पक्षांच्या वकिलांच्या युक्तिवादानंतर माझ्या विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहेत.

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | दि.२४/१२/२०२४ रोजी २०.०० वाजण्याच्या सुमारास घटनास्थळी आरोपी क्र.१ हिने विधीसंघर्षग्रस्त बालकासह संगनमत करुन झाडाची कुंडी हातात घेवुन फिर्यादीच्या डोक्यात मारुन त्यांना स्वेच्छेने दुखापत केली व त्याद्वारे भारतीय न्याय संहितेचे कलम, २०२३ चे कलम ११८ (१) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही |
| २. | अंतिम आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## <u>अभियोगपक्षाचा पुरावा</u>

७. नानासो लक्ष्मण कांबळे (सा.क्र.१) (नि.क्र.१२) यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, दि.२६/१२/२०२४ रोजी जयसिंगपूर पोलिसांनी त्यांना पोलिस स्टेशन येथे बोलाविले होते. पोलिसांनी त्यांची एका कागदावर सही घेतली. घटनास्थळ पंचनाम्यावर त्यांची अनु.क्र.१ ला सही असल्याचे त्यांनी मान्य केले परंतू त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे सांगीतले.

८. अनिल सदाशिव भानुसे (सा.क्र.२) (नि.क्र.३३) यांनी त्यांच्या सरतपासात

असे कथन केले आहे की, ते आरोपीला ओळखतात. दि.२४/१२/२०२४ रोजी रात्री ०८.०० वा. चे सुमारास त्यांचे व आरोपीमध्ये किरकोळ वाद झाला होता. त्यांनी आरोपीविरुध्द गैरसमजुतीतुन तक्रार दिली होती. तक्रारीवर त्यांची सही आहे परंतू त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे सांगीतले. तसेच आरोपीने झाडाची कुंडी हातात घेवुन त्यांच्या डोक्यात मारहाण केली नसलेबाबत सांगुन त्यांची आरोपीविरुध्द काही तक्रार नसल्याचे सांगीतले. अभियोगपक्षातर्फे सदर दोन्ही साक्षीदारांना भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम १५७ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारले असता अभियोगपक्षाच्या लाभात कोणताही कबुली जबाब त्यांच्या मुखातुन मिळु शकला नाही. त्यांनी अभिकथीत पंचनामा आणि घटना घडल्याचे सांगितले नाही.

## कारण मिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करिता–**

**९.** पंच आणि फिर्यादी यांनी पंचनामा आणि फिर्यादमधील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले नाही. त्यामुळे अभियोगपक्ष पंचनामा आणि फिर्याद मधील मजकुर हा सिध्द करु शकला नाही. पंच आणि फिर्यादी यांनी अभिकथीत पंचनामा आणि घटना घडल्याचे सांगितले नाही. पंच आणि फिर्यादी यांनी अभियोगपक्षाची हकीकत ही पुर्णतः नाकारली आहे. सदर साक्षीदारांचे कथन पाहता अभिकथीत घटना घडल्याविषयी निश्चितच शंका उपस्थीत होते. यातील मुळ फिर्यादी यांनी नि.क्र.३५ ला पुरसीस दाखल करुन त्यांना जादा पुरावा देणेचा नसल्याचे नमुद केले आहे. सा.क्र.१ व २ चे कथन व पुरसीस निशाणी ३५ पाहता अभियोगपक्षाचा पुरावा हा बंद करण्यात आला.

**१०.** न्यायाचे तत्व आहे की अभियोगपक्षाने आरोपीच्या विरुध्दचे आरोप हे संशयाच्या पलिकडे जावून सिध्द करणे गरजेचे आहे. अभियोगपक्षाने आरोपीवर ज्या भारतीय न्याय संहिता कायद्याच्या अंतर्गत दोषारोपपत्र दाखल झाले आहे त्याप्रमाणे अनुषंगिक घटक हे पुराव्यानिशी सिध्द न केल्याने आरोपीस संशयाचा फायदा देणे न्यायोचित ठरते. त्यामुळे अभिलेखावर उपलब्ध असलेला पुरावा, वर नमुद कारणासह

विचारात घेतला असता अभियोगपक्षाने अभिकथित घटना घडल्याबाबतचा सबळ पुरावा आणलेला नाही. त्यामुळे एकंदर अभिलेखावरील उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता अभियोगपक्षाने आरोपी क्र.१ वर ठेवण्यात आलेला दोषारोप सक्षम व परिपोषक साक्षीपुराव्यानिशी निसंदिग्धपणे सिध्द केला नाही असे माझे मत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नाही असे नोंदवित आहे व मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र.**१. दिपाली सुनिल भानुसे,** रा.हनुमान मंदिरजवळ, कोंडीग्रे चौक, कोंडीग्रे, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांची भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८ (१) सह कलम ३ (५) प्रमाणे अंतर्भूत वर्णिलेल्या अपराधातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१ (१) मधील प्रावधानित तरतुदीनुरूप निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येतो.

३. प्रस्तुत प्रकरणातील अभिकथित जप्त मुद्देमाल हा मुल्यहिन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणेत यावा.

४. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ मध्ये नमुद प्रमाणे सहा महिन्याच्या कालावधीकरीता रूपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रकमेचे जामिनपत्र दयावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.05.25 17:47:58 +0530

**(अ. त्रिं. मनगिरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.१
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

दिनांक: २५/०५/२०२६

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 25/05/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 25/05/2026. |
| Judgment/order uploaded on | 25/05/2026. |